**प्रेसनोट दि. ३१.०५.२०२२**

लोकसेवक श्री.चारूदत्त शंकरराव गावडे, वय ५७ वर्ष, व्यवसाय – अव्वल कारकून, उप जिल्हाधिकारी भुसंपादन क्र.६ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. रा. हुजर कॉम्पलेक्स पाठिमागे, भिवघाट रोड, तासगांव ता.तासगांव जि. सांगली यांना ५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे शेतजमीन क्षेत्रावर असलेल्या "तबदिलीस मनाई" हा शेरा कमी करुन देणे करीता श्री. गावडे अव्वल कारकून यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.१०.०५.२०२२ रोजी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १०.०५.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. गावडे अव्वल कारकून यांनी तक्रारदार यांचे शेतजमीन क्षेत्रावर असलेल्या "तबदिलीस मनाई" हा शेरा कमी करुन देणे करीता ५०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.३१.०५.२०२२ रोजी लोकसेवक श्री. गावडे अव्वल कारकून यांचे विरूध्द उप जिल्हाधिकारी भुसंपादन क्र.६ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री.चारूदत्त शंकरराव गावडे, वय ५८ वर्ष, व्यवसाय – अव्वल कारकून, उप जिल्हाधिकारी भुसंपादन क्र.६ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. रा. हुजर कॉम्पलेक्स पाठिमागे, भिवघाट रोड, तासगांव ता.तासगांव जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ५०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री.चारूदत्त शंकरराव गावडे, वय ५८ वर्ष, व्यवसाय – अव्वल कारकून, उप जिल्हाधिकारी भुसंपादन क्र.६ जिल्हाधिकारी कार्यालय सांगली. रा. हुजर कॉम्पलेक्स पाठिमागे, भिवघाट रोड, तासगांव ता.तासगांव जि. सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार धनंजय खाडे, प्रितम चौगुले, अविनाश सागर, भास्कर भोरे, सलिम मकानदार, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अ‍ॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अ‍ॅप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Dy. Supdt. of Police, Anti Corruption Bureau, SANGLI.

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with Oken Scanner